# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.03.2026** **वार- रविवार**

---

**<u>पोटनिवडणूक</u>**

आसाम, केरळ, पुदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकांचं वेळापत्रक केंद्रीय निवडणूक आयोगानं आज जाहीर केलं. आसाम, केरळ आणि पुदुच्चेरीमध्ये येत्या ९ एप्रिलला, तर तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला मतदान होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यात निवडणूक होईल. राज्यातील बारामती आणि राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रमही आज जाहीर करण्यात आला. या दोन्ही ठिकाणी 23 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. सर्व ठिकाणची मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

देशात सर्वाधिक गतिशीलतीने झालेल्या मेट्रो प्रकल्पात पुणे मेट्रोचा उल्लेख करावा लागेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. पुण्यात मेट्रोच्या जिल्हा न्यायालय स्थानकात उभारण्यात आलेल्या मेट्रो भवन प्रकल्पाचं उद्घाटन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी, महापौर मंजुषा नागपुरे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी यावेळी उपस्थित होते.

पुणे हे वेगानं विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असल्याने येत्या काळात 200 किलोमीटरचा मेट्रो मार्ग तयार केला जाणार आहे, त्याचा प्रकल्प आराखडा तयार करण्याचे आदेश महामेट्रोला देण्यात आले आहेत असं फडणवीस यांनी सांगितलं. शिवाजीनगर ते हिंजवडी या मेट्रो मार्गातील अकरा किलोमीटरच्या टप्प्याचं लोकार्पण मे महिन्यात होईल, तर उर्वरित 12 किलोमीटरचं काम जुलै महिन्यात पूर्ण होईल असं ते म्हणाले. पुणे शहर  वाहतूक कोंडीमुक्त करण्याचा निर्धार सरकारनं केला असून, शहरातून जमीन, हवाई वाहतूक आणि जमिनीखालील रस्ते यातून वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान देशात गॅसचा पुरेसा साठा असून, नागरिकांना रांगा लावण्याची गरज नाही, काँग्रेसचे लोक विनाकारण भीती निर्माण करत आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केलं.

**<u>राष्ट्रीयपरिषद</u>**

देशभरातील महिला लोकप्रतिनिधींची राष्ट्रीय परिषद २२ मार्च रोजी दिल्लीमध्ये होणार आहे. महाराष्ट्रातून २६ महिला लोकप्रतिनिधी या राष्ट्रीय परिषदेत सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय परिषदेसाठी दौंड तालुक्यातील पानवलीच्या सरपंच प्रज्ञा भांड यांची निवड झाली असून, या परिषदेत त्या पुणे जिल्ह्याचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

**<u>पुणेजिल्हापरिषद</u>**

पुणे जिल्हा परिषदेचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प येत्या १७ मार्च रोजी सादर केला जाणार आहे. प्रशासक गजानन पाटील सकाळी ११ वाजता अर्थसंकल्प मांडतील. शासनाच्या निर्देशानुसार २७ मार्चपूर्वी अर्थसंकल्प मंजूर करणे बंधनकारक असल्याने प्रशासकांकडूनच ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. जिल्हा परिषद अध्यक्षांची निवड १८ मार्च रोजी होत आहे. मात्र अध्यक्ष निवडीनंतर सर्वसाधारण सभा बोलावण्यासाठी आवश्यक असलेला किमान १२ दिवसांचा कालावधी उपलब्ध होत नसल्याने प्रशासक अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

**पणनविभाग**

पणन विभागानं 14 जिल्ह्यात हमी भावाने मका खरेदी केला असून, हा मका आता शिधापत्रिकांवरून वितरित केला जाणार आहे. फेब्रुवारी अखेर खरेदी करण्यात आलेला मका वितरित करण्याचे निर्देश पुरवठा विभागाला देण्यात आले आहेत. गव्हाच्या बदल्यात मका देण्यात येणार असून, प्राधान्य योजनेत प्रति व्यक्ति मिळणाऱ्या धान्यात आता 2 किलो गव्हासह 1 किलो मका देण्यात येणार आहे, तर अंत्योदय योजनेतील प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला 11 किलो गव्हासह 11 किलो मका देण्यात येणार आहे.

**पंडितहरिप्रसादचौरसिया**

एखाद्या राग निर्मितीचा विचार करताना, त्याच्या सादरीकरणातून आत्मिक सुंदरता रसिकांसमोर उलगडल्यास त्याला भरभरून दाद मिळते, अशी भावना ज्येष्ठ बासरीवादक पंडित हरिप्रसाद चौरसिया यांनी काल पुण्यात व्यक्त केली. रूपक कुलकर्णी म्युझिक फाऊंडेशन आणि ब्लिसफुल विंड्स फाऊंडेशननं पुण्यात “बासरी परंपरा” या दोन दिवसांच्या संगीत महोत्सवाचं आयोजन केलं आहे. या महोत्सवात काल पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्याशी संवादात्मक कार्यक्रम झाला. पंडितजींची निर्मिती असलेल्या ‘प्रभातेश्र्वरी’, ‘इंदिराकल्याण’, ‘कलारंजनी’, ‘हरिप्रिया’, ‘मधुमल्हार’ या रागांच्या निर्मितीमागील संकल्पना त्यांनी स्वतः विशद केली.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे 80 ते 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. सर्वच फळभाज्यांचे भाव स्थिर असून, बहुतांश पालेभाज्यांच्या भावात घसरण झाली आहे. फळांचे भावही स्थिर आहेत. आज आवक कमी झाल्याने फुलांचे भाव तेजीत आहेत.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 37 आणि किमान तापमान 17 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतसह विविधभारती पुणे केंवर संध्याकाळी 6 वाजता. नमस्कार.**